Publication: Lokmat
Date: 19/6/2019
Page: 3
Column: 3

लोकमत मुंबई, बुधवार, दि. १९ जून २०१९

# शहराला सुरक्षित ठेवण्यासाठी एईएमएल सज्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने (एईएमएल) विभागांमध्ये मान्सूनकाळात राबवण्यात येणाऱ्या सुरक्षा उपायांची घोषणा केली आहे. विभागांमधील इन्स्टॉलेशन्सच्या सुरक्षिततेची खात्री घेत एईएमएलने मान्सून काळात नोंद करण्यात आलेल्या कोणत्याही आपत्तीजनक स्थितीचे निराकरण करण्यासाठी सेंट्रल डिझास्टर कंट्रोल रुम (सीडीसीआर) कार्यान्वित केले आहे. एईएमएलने कोणत्याही संभाव्य नैसर्गिक आपत्तीदरम्यान वीजपुरवठा वितरणाचे नुकसान कमी करण्यासाठी एकीकृत आपत्ती व्यवस्थापन योजनेचा अवलंब केला आहे. कंपनीने त्यांच्या संबंधित पायाभूत सुविधांसह सुसज्जित प्रतिसाद, रिकव्हरी आणि सुधारणा योजना देखील सादर केली आहे.